Pardeshi प्रत मिळाली 18/12/19

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): सातारा **P.S.**(ठाणे): वाई **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0236 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 18/12/2019 09:55 बजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From** (दिनांक पासून): 17/12/2019

**Time Period** (कालावधी): पहर 7 **Date To** ( दिनांक पर्यंत): 17/12/2019

**Time From** (वेळेपासून): 21:47 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 21:47 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 18/12/2019 **Time** (वेळ): 09:44 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 010 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 18/12/2019 09:44 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): वाई तहसिल कार्यालयाचे समोर , धोम कॉलणी वाई,वाई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.साईनाथसिंग प्रल्हादसिंग परदेशी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.**(अ. | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 393/ए प्लॅंट नं 5,शारदा निवास शाहुपुरी,सातारा,सातारा,शाहुपुरी पोलीस स्टेशन,सातारा, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 393/ए प्लॅंट नं 5,शारदा निवास शाहुपुरी,सातारा,सातारा,शाहुपुरी पोलीस स्टेशन,सातारा, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-8805011107

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजु माणिकराव शेडमाके | | | 1. धोम कॉलनी, सोनगिरवाडी,वाई,वाई, सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे** एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब दिनांक 18/12/2019मी, श्री.साईनाथसिंग प्रल्हादसिंग परदेशी, वय- 41 वर्षे, व्यवसाय- वाहतुक, राहणार 393/ए प्लट नं 5, शारदा निवास शाहुपुरी, सातारा ता.जि.सातारा मोबाईल नंबर 8805011107.फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियासमवेत राहणेस असुन माझा वाहतुकीचा व्यवसाय आहे. दिनांक 16/12/2019 रोजी मी श्री.श्रीहरी पाटील, पोलीस उपअधीक्षक, न्टी करप्शन ब्युरो, पुणे यांना मोबाईलफोन वरुन संपर्क करुन माझी तहसिल कार्यालय वाई येथील तहसिलदार व क्लार्क यांच्याविरुदध लाच मागणीची तक्रार आहे. असे माझे मित्राचे मोबाईल क्रमांक 9422600022 वरुन कळविले असता श्री.पाटील यांनी मला दिनांक 17/12/2019 रोजी त्यांचे पुणे येथील पथकासह कारवाईकामी वाई येथे येणार असल्याचे सांगितले. तसेच दिनांक 17/12/2019 रोजी मला संपर्क करुन भेटण्याच्या ठिकाणाबाबत ठरविण्यात येणार असल्याचे कळविले. त्यानुसार दिनांक 17/12/2019 रोजी सकाळी श्री.श्रीहरी पाटील साहेब यांनी मला वरील नमुद नंबरवर संपर्क करुन श्री हटेल न्ड लजिंग, वाई येथे येण्यास सांगितले. सदरवेळी श्री.पाटील साहेब यांनी मला कळविले की कार्यकारी अभियंता, मराविवि कंपनी, वाई यांचेकडील पंचांना माझेकडील सदरचा संपर्क क्रमांक देण्यात आला असुन त्यांना त्यांचेशी संपर्क करुन त्यांच्यासह येण्याबाबत सांगितले. कार्यकारी अभियंता, मराविवि कंपनी वाई यांचेकडील पंच श्री रासकर यांनी माझ्याशी संपर्क साधल्याने त्यांना मी माझेकडील इनोव्हा वाहन क्रमांक एमएच 11 सीसी 7077 मध्ये घेवुन आपण ठरविलेल्या श्री हटेल न्ड लजिंग येथे दुपारी 01.00 वा. दरम्यान घेवुन आलो. सदर ठिकाणी त्यांनी माझी, सापळा पथक व दोन्ही पंच,यांच्याशी ओळख करुन दिली. सापळा पथकामध्ये श्री.श्रीहरी पाटील यांचेसह पोलीस निरीक्षक, श्रीमती सरग मडम, पोलीस नाईक गोसावी, महिला पोलीस शिपाई कादबाने व चालक श्री वाळके यांचा समावेश होता. तसेच पंच म्हणुन श्री. स्वप्निल जाधव व राजेंद्र रासकर यंाचा समावेश होता. सदर श्री हटेलच्या रुम नं 202 मध्ये मी माझी लेखी तक्रार लिहुन दिली व पंचांना कथन केली ती माझा वाहतुकीचा व्यवसाय असुन दि.11/12/2019 रोजी दु.01.20 वा.भुईंज येथे माझी गाडी क्र.एम एच 11 ए एल 6040 असुन त्यातुन मी खडी क्रशर वरुन क्रश सँडची वाहतुक करीत असताना भुईंज तलाठी अडसुळ मडम यांनी थांबवुन भुईंज पोलीस स्टेशन येथे लावली. मला मडमनी सांगितलेप्रमाणे मा.तहसीलदार सोस, वाई यांना भेटण्यास सांगितले. त्या दिवशी उशीर झाल्याने ते उद्या बोलु असे म्हणाले. दुस-या दिवशी दि.12/12/2019 रोजी मी पुन्हा तहसिलदार सोा यांना भेटलो त्यांनी मला रक्कम रुपये 2,11,600/-इतका दंड होईल असे सांगितले असता मी दंड कमी करण्याची विंनती केली असता त्यांनी बाहेर थांबण्यास सांगितले. थोडयाच वेळात श्री.शेडमकर हे माझ्याकडे आले व चर्चा केली. तुमचा दंड रु.2,11,600/- इतका होतो. मा.तहसिलदार सो. वाई यांनी दंउ कमी करुन रु.1,11,600/- सांगितला आहे व तुम्हास आम्हाला रुपये 50,000/- द्यावे लागतील. मी त्यांना बोललो जरा रक्कम कमी करा तुम्ही मा. आरटीओ यांना सुद्धा पत्र दिलेले आहे तरी रक्कम कमी करावी ते म्हणाले साहेब ऐकणार नाही तरी नंतर रु.25,000/- देण्याचे ठरले. श्री. शेडमकर म्हणाले लगीच पैसे द्यावे लागतील मी म्हणालो माझ्याकडे 20,000/-रु.आहेत. ते म्हणाले तेवढे द्या म्हणजे मी साहेबांना सांगुन तुमचे

काम मार्गी लावतो त्यामुळे नाईलाजास्तव माझ्या कडील रु.20,000/- शेडमकर यांना दिले त्यांनतर शेडमकर म्हणाले मी हयाच्यावर तहसिलदार सो यांच्या सहया घेऊन प्रकरण मार्गी लावतो. दि.13/12/2019 रोजी त्यांनी मला आर टी ओ चे पत्र दिले व आर टी ओ रिपोर्ट घेऊन या असे म्हणाले. शनिवार व रविवार सुट्टी असुन सोमवार दि.16/12/2019 रोजी तुमच्या आदेशावर तहसिलदार यांच्या सहया घेऊन ठेवतो असे सांगुन उर्वरित रक्कम सोमवारी घेऊन या असे म्हणाले. मी दि.16/12/2019 रोजी त्यांना आर टी ओ चे पत्र दिले व त्यांनतर त्यांनी मला नव्याने रु.1,11,600/- चे चलन देऊन ती रक्कम बँकेत भरण्यास सांगितली. मी रक्कम रु.1,11,600/-चे चलन एस बी आय बँकेत वाई येथे भरली व त्याची पोच शेडमकर यांना दिली. नंतर ते म्हणाले आता तुम्हाला बाँड द्यावा लागेल मी त्यांना म्हणालो बाँड नको मी पुर्ण दंड भरला आता कशाला बाँडने, म्हणाला तुम्ही उद्या साहेबांना भेटा व बोला तरी मी आज दि.17/12/2019 रोजी शेडमकर व तहसिलदार सो यांना भेटुन बाँड न घेण्याबाबत विंनती करणार आहे. तसेच दंड भरलेला असल्यामुळे गाडी सोडुन देण्यासाठी विंनती करणार आहे. त्या करिता त्यांनी मागितलेली लाचेची उर्वरित रक्कम रु:5,000/-ची मागणी केल्यास ती रक्कम मी त्यांना देणार आहे. तरी त्यांचेवर कारवाई करावी हि विनंती. माझी वरील तक्रार वाचल्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती सरग व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. मी दिलेल्या लाचेच्या तक्रारीचे अनुषंगाने तहसिल कार्यालय, वाई येथील तहसिलदार भोसले साहेब व क्लार्क श्री.शेडमाके यांची माझ्याकडे लाच मागणी आहे अगर कसे याबाबत पडताळणी करण्याचे ठरले त्यानुसार मला व दोन्ही पंचांना पोलीस निरीक्षक, सरग मडम यांनी व्हाईस रेकर्डरबाबत माहिती देवुन त्याचे चालु बंद करण्याचे प्रात्यक्षिक दाखवुन सविस्तर माहिती दिली. त्यानंतर माझे व पंच क्रमांक 1 श्री.जाधव यांचे निवेदने घेतली पडताळणीच्या अनुषंगाने मला माझा भाऊ भुप्रंद्रसिंग परदेशी तसेच दोन्ही पंचांना सरग मडम यांनी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस नाईक गोसावी यांचेकरवी माझे शर्टचे आतील बनियानला व्हाईस रेकर्डर लावुन माझ्याकडील गाडीने माझा भाऊ तसेच पंच क्रमांक 1 यांचेसह लोकसेवक श्री.भोसले व शेडमाके यांची भेट घेणे कामी तहसिल कार्यालय वाई येथे रवाना केले. तहसिल कार्यालय वाई येथे गेल्यानंतर तहसिलदार श्री भोसले हे बाहेर चालले होते बाहेर जाताना त्यांनी माझ्या भावास जेवण करुन आल्यावर बघु असे म्हणुन निघुन गेले. त्यानंतर आम्ही परत श्री हटेल न्ड लजिंग येथील कक्ष नं 202 येथे परत आलो. सदरच्या पडताळणीदरम्यान लोकसेवक भोसले व शेडमाके यांच्याशी माझी भेट न झाल्याने पुन्हा पडताळणी करण्याचे ठरले. तत्पुर्वी माझ्या मोबाईलवरुन लोकसेवक श्री. शेडमाके यांना संपर्क करुन तहसिलदार साहेब यांचे उपस्थितीबाबत माहिती घेण्याचे ठरले त्यानुसार मी लोकसेवक यांना संपर्क केला असता त्यांनी साहेब ऑफिसला आल्यानंतर फोन करतो असे सांगितले. सदरचा कल व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे. बराच कालावधीनंतर लोकसेवक श्री. शेडमाके यांचा मला फोन न आल्याने मला पंच क्रमांक 1 श्री.जाधव व माझा भाऊ भुपेंद्र यांचेसह लोकसेवक भोसले व क्लार्क शेडमाके यांची भेट घेण्याकामी पाठवुन लाच मागणीबाबत पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार सरग मडम यांनी पडताळणीच्या अनुषंगाने मला माझा भाऊ भुप्रंद्रसिंग परदेशी तसेच दोन्ही पंचांना सुचना देवुन माझे शर्टचे आतील बनियानला व्हाईस रेकर्डर लावुन माझ्याकडील गाडीने माझा भाऊ तसेच पंच क्रमांक 1 यांचेसह लोकसेवक श्री.भोसले व शेडमाके यांची भेट घेणे कामी तहसिल कार्यालय वाई येथे रवाना केले.पडताळणीदरम्यान माझी व तहसलिदार भोसले साहेब यांचेशी समक्ष भेट झाली त्यावेळी त्यांनी माझेसोबत माझ्या कामासंदर्भात चर्चा केली परंतु माझेकडे लाच मागणीसबंधाने चर्चा झाली नाही. त्यानंतर लोकसेवक श्री.शेडमाके यांच्याशी समक्ष भेट झाली असता त्यांनी माझ्याकडे माझ्या प्रलंबित कामासंदर्भात चर्चा केली. चर्चेदरम्यान मी त्यांना यापुर्वी तुम्हाला मी दिले होते वीस हजार रुपये, वरचे मंग कधी दयायचे गाडी सुटल्यावर दयायचे का, यावर श्री शेडमाके मला दयाकी आता, गाडी सुटल्याव काय, गाडी सोडणारच आहे की, यावर मी त्यांना पैसे देवुन बघा की किती दिवस अडकलोय, तुम्ही बघा, मी पैसे दिलेत तरी माझी गाडी अजुन उशीर लागतोय, असे म्हणालो असता लोकसेवक श्री.शेडमाके मला तुमचा सकाळी मी देतो, त्यांना सांगतो जर झाले तर असे म्हणाले. यावर मी त्यांना ठिक आहे एक काम करतो उदया तुम्हाला आत्ता लगीच येतो, मंग यावर लोकसेवक शेडमाके मला आत्ता दयाकी, उदया,परवा कशाला असे म्हणुन माझ्याकडे यापुर्वी ठरलेल्या एकुण पंचवीस हजार रुपये मधील वीस हजार रुपये दिलेले असल्याने उर्वरित शिल्लक रक्कमेची लाच मागणी केली. त्यानंतर मी पंच व माझ्या भावासह श्री हटेलमध्ये परत आलो. पडताळणीदरम्यान क्लार्क श्री. शेडमाके यांची माझ्याशी समक्ष भेट झाली. त्यावेळी क्लार्क श्री. शेडमाके यांनी तक्रारदार यांचे डंपरला केले दंडाची रक्कम कमी करण्यासाठी व जप्त केलेली गाडी सोडणेसाठी यापुर्वी ठरलेल्या एकुण पंचवीस हजार रुपये मधील वीस हजार रुपये दिलेले असल्याने उर्वरित शिल्लक रक्कमेची मागणी केलेली असल्याने सापळा कारवाईच्या वेळी लोकसेवक यांना माझ्या फोनवरुन संपर्क करुन शिल्लक रक्कम 5000/- रुपयाची पुर्तता करण्यात आली असुन सदरची रक्कम देण्यासाठी ठिकाण निश्चित करुन सदरची लाच रक्कम देण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार मी माझ्याकडील 5000/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष पोलीस निरीक्षक, सरग मडम यांच्याकडे हजर केली. त्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन ठेवुन मला व पंचांना अंथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजुन सांगितले. त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई श्री हटेलचे कक्ष नं. 202 मध्ये केली व सदरची रक्कम रुपये 5000/- ही माझ्या शर्टच्या डाव्या बाजुचे खिशात अलगद ठेवली. सापळा कारवाईसंबंधाने पाटील साहेबांनी व सरग मडम यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. तसेच लोकसेवक शेडमाके यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी माझा भाऊ भुपेंद्र यास साहेब, उदया ऑर्डर देतो म्हणत्यात, असे मोठयाने म्हणावे असा लाच रक्कम स्विकारल्याचा पुविनियोजित इशारा ठरविण्यात आला. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं. 1 व भाऊ भुपेंद्र सिंग यांचे सोबत पोना गोसावी असे माझेकडील इनोव्हा कारमधुन वाई तहसिल कार्यालयाकडे जात असताना मी माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करुन लोकसेवक शेडमाके यांना संपर्क केला व उर्वरित रक्कम पाच हजार रुपये रक्कमेची व्यवस्था झाली आहे. मी कुठे येवु असे विचारले असता त्यांनी तहसिल कार्यालय, वाई येथे येण्यास सांगितले. त्यानंतर आमचे पाठोपाठ सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी तहसिल कार्यालय वाई येथे शासकीय वाहनाने काही अंतरावर येवुन थांबले. तहसिल कार्यालय वाई येथे गेल्यानंतर मी लोकसेवक शेडमाके यांची भेट घेतली. लोकसेवक शेडमाके यांना मी उर्वरित 5000/- रुपयांची रक्कम आणली असुन ती मोजुन घ्या असे म्हणुन मी माझे शर्टचे डावे बाजुचे खिशातुन लाच रक्कम उजव्या हाताने काढुन शेडमाके यांच्यासमोर धरली असता त्यांनी ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या नेसत्या ट्रक पँन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली यांनतर मी माझ्या भावास आवाज देवुन लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. पंच नं.2 व सापळा पथक असे सर्वजण माझ्या जवळ आले. त्यावेळी त्यांनी लोकसेवक यांना ताब्यात घेतले.त्यानंतर पकडलेल्या स्थितीत त्यांना शासकीय वाहनात बसवले व मला शासकीय वाहनाबाहेर थांबण्यास सांगितले. काही वेळाने मला शासकीय वाहनात बोलावुन माझी अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पे-यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे पुढील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर मला वाहनाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर लिपिक शेडमाके यांना ताब्यात घेवुन पाटील साहेब व सरग मडम व दोन्ही पंच तसेच सापळा पथक असे सोबतच्या वाहनांनी तसेच मी व माझा भाऊ असे माझ्याकडील वाहनाने श्री हटेल न्ड लजिंगच्या रुम नं 202 येथे आलो. सदरबाबतचा सविस्तर पडताळणी व सापळा पंचनामा श्री हटेल न्ड लजिंगच्या रुम नं 202 येथे टंकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे. तरी दिनांक 17/12/2019 रोजी मी लेखी दिलेली माझी मुळ तक्रार त्या तक्रारीच्या अनुषंगाने

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Anandrao Tukaram Khobare(I (Inspector)) / POBN67110 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Rank (पद):
No.(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of **jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to **the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy** given to the **complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** Anandrao Tukaram Khobare
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN67110

पोलीस स्टेशन ऑफिसर
वाई पोलीस ठाणे